**MHAH230000812022**

**रेखा रमाकांत कुलकर्णी**
**वि.**
**लक्ष्मीकांत विश्वनाथ चांदेकर**

## नियमीत दिवाणी दावा क्र. ४०/२०२२ मधील निशाणी क्र. ३५ वरील आदेश

१. वादी यांनी सदरचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. २ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. २ दिलीप विश्वनाथ चांदेकर हे दि. ११.०७.२०२२ रोजी मौजे. अहमदनगर येथे मयत झालेले आहे व त्याचे वारस म्हणजेच प्रतिवादी क्र. १० व ११ हे दाव्यात पुर्वीच समाविष्ट केलेले होते व आहेत. प्रतिवादी क्र. २ मयत झाल्याबाबत दाव्यात योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक होते परंतू प्रतिवादी क्र. २ मयत झाल्याबाबतची कागदपत्रे मिळण्यास विलंब झाल्यामुळे सदरचा दावा प्रतिवादी क्र. २ यांच्या विरुध्द अबेट झालेला आहे. सदरचा अबेटचा आदेश रद्द झाल्यास उर्वरित प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. असे नमुद करुन अर्ज मंजुर करण्याची विनंती केली. सदर अर्जावर योग्य तो आदेश करण्यात यावा अशा स्वरुपाचे म्हणणे उर्वरीत प्रतिवादी यांनी दाखल केलेले आहे.

३. वादी व प्रतिवादी यांचे म्हणणे व युक्तिवाद ऐकला. दावा हा प्रतिवादी यांचे विरुध्द वाटपाकरीता दाखल केलेला आहे. मयत प्रतिवादी क्र. २ यांचे दाव्यामध्ये हितसंबंध आहे हे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्याकरीता व दाव्याची अनेकत्वे टाळण्याकरीता प्रतिवादी क्र. २ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब या न्यायालयाने माफ केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. २ यांचे विरुध्द अबेटमेंटचा झालेला आदेश रद्द केल्यास उर्वरीत प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब खालील आदेश.

नियमीत दिवाणी दावा क्र. ४०/२०२२
निशाणी क्र. ३५

# आदेश

१. वादी यांचा निशाणी ३५ वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. २ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Digitally signed by RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Date: 2026.01.28 17:04:18 +0500

**दिनांक** – २७.०१.२०२६

**ठिकाण** – श्रीगोंदा

रविंद्र भ. खवले,

**२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**

**श्रीगोंदा**